# भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राचे योगदान



संपादक
डॉ. संदीप नामदेव मिरे
सह-संपादक
प्रा. गहिनीनाथ लिंबराज शेळके
प्रा. सोपान लक्ष्मण नवथर

Scanned with OKEN Scanner

# भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राचे योगदान

**संपादक**

डॉ. संदीप नामदेव मिरे

**सह-संपादक**

प्रा. गहिनीनाथ लिंबराज शेळके

प्रा. सोपान लक्ष्मण नवथर

**निशा पब्लिकेशन एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स**

कानपुर (उ.प्र.)

Scanned with OKEN Scanner

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी-फोटोकॉपिंग, रेकार्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या आणि लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

**ISBN 978-93-94800-16-8**

**पुस्तक** : भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राचे योगदान

**संपादक** : डॉ. संदीप नामदेव मिरे

**सह-संपादक** : प्रा. गहिनीनाथ लिंबराज शेळके

प्रा. सोपान लक्ष्मण नवथर

**प्रकाशक** : **निशा पब्लिकेशन एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स**

120/742 नारायणपुरवा, कानपुर

Email : nishapublication123@gmail.com

Mob. : 9506361570

**संस्करण** : प्रथम, 2023

© : संपादक

**मूल्य** : 500/-

**शब्द-सज्जा** : रुद्र ग्राफिक्स, कानपुर

**मुद्रक** : सार्थक प्रिंटर्स, कानपुर

***आर्थिक अनुदान :*** *भारतीय समाज विज्ञान संशोधन परिषद, न्यू दिल्ली*

Scanned with OKEN Scanner

१३. कामगार चळवळीतील नारायण मेघाजी लोखंडे यांचे योगदान
प्रा. डॉ. काकडे बी. जे.
प्रा. गंडाळ ए.टी. ९७

१४. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील महाराष्ट्रातील महिलांचे योगदान
प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम १०१

१५. भारतीय स्वातंत्र्य लढा : महाराष्ट्रातील ज्ञानोदय वृत्तपत्राची भूमीका
डॉ. उषा विटकर १०९

१६. थोर स्वातंत्र्य सेनानी सहकारातील अग्रणी नेते बानाभाऊ सुकाळकर पाटील
प्रा. डॉ. सोनवणे राजाराम रामदास ११२

१७. भारतीय स्वातंत्र्य चळवळ व कामगार नेते ना. ग. गोरे यांची भूमिका
प्रा. शेळके गहिनीनाथ ११६

१८. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अहमदनगर जिल्ह्याचे योगदान
प्रा. नवथर सोपान लक्ष्मण १२१

१९. होमरूल चळवळीचे भारतीय स्वातंत्रलढ्यातील योगदान
स. प्रा. गडगे शांता रंगनाथ १९

२०. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये महाराष्ट्रातील आदिवासी चळवळीचे योगदान
प्रा. शैलेश कुशेंद्र भालेराव १३४

२१. 'राष्ट्रवीर' साप्ताहिकाने भारतीय स्वातंत्र्यलढ्यात दिलेले वैचारिक योगदान
प्रा. विशाल रामदास रोकडे १३८

२२. आदिवासी जमातींचे इतिहास पुनर्लेखन करणे आधुनिक काळाची गरज आहे
श्री प्रकाश महादू गावित १४१

२३. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये महाराष्ट्रातील आदिवासी व दलित चळवळीचे योगदान
चंद्रभागा शंकर उघडे १४६

२४. युगपुरुष–कॉम्रेड एकनाथराव भागवत साहेब (कम्युनिस्ट पक्ष आणि चळवळी)
योगेश भास्करराव कवळे १५२

२५. भारतीय स्वातंत्र्य लढयामध्ये महाराष्ट्रातील महिलांचे योगदान
प्रविण अर्जुन गरुड १६२

Scanned with OKEN Scanner

१९

# होमरूल चळवळीचे भारतीय स्वातंत्रलढ्यातील योगदान

स. प्रा. गडगे शांता रंगनाथ

भारतीय चळवळीत 'होमरूल चळवळ' ही एक वैशिष्ट्यपूर्ण चळवळ घडून आली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत होमरूल लीग ही राष्ट्रीय सभेच्या विरोधी नव्हती तर पूरक संघटना होती. स्वराज्य हे राष्ट्रीय सभेचे ध्येय ठरवले होते व या ध्येयप्राप्तीसाठी भारतीयांनी सतत चळवळ करणे आवश्यक होते.स्वराज्याप्रती जनतेमध्ये जागृती निर्माण होणे आवश्यक होते म्हणून डॉ ॲनी बेझंट व लोकमान्य टिळक यांच्या नेतृत्वाखाली ही चळवळ भारतात घडून आली.आपल्या देशाचा राज्यकारभार करण्याचा अधिकार आपण प्राप्त करून घेणे म्हणजे होमरूल होय. या चळवळीने स्वातंत्र्य चळवळीत गतिमानता आणली.मूलतः ही चळवळ आयर्लंड येथे ब्रिटीशांच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी श्री रेडमांड यांच्या नेतृत्वाखाली आयरिश लोकांनी सुरु केली होती.भारतीयांमध्ये राजकीय जागृती निर्माण करण्यासाठी भारताला आपली कर्मभूमी मानून त्यांनी ही चळवळ भारतामध्ये सुरु केली. डॉ ॲनी बेझंट यांनी १९१३ साली कॉंग्रेसचे सदस्यत्व स्वीकारले त्यावेळी त्यांनी कॉंग्रेसने भारतात होमरूल चळवळ सुरु करावी असा आग्रह धरला परंतु कॉंग्रेसवर नेमस्तांचे वर्चस्व असल्याने त्यांनी या चळवळीकडे दुर्लक्ष केले.१९१५ मध्ये मुंबई येथे भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात सुद्धा होमरूल विषयी डॉ ॲनी बेझंट यांनी आग्रह धरला होता.

## उदिष्ट्ये

१. होमरूल चळवळीच्या स्थापनेचा आढावा घेणे.
२. भारतीय स्वातंत्र लढ्यामधील योगदानाचा आढावा घेणे.
३. होमरूल चळवळीने भारतीय स्वातंत्र्यासाठी परदेशात केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
४. स्वातंत्र लढ्यामधील प्रभावाची माहिती घेणे.

## गृहीतके

१. महाराष्ट्रातील होमरूल चळवळीची स्थापना लोकमान्य टिळक यांनी केली.
२. जहाल राजकारणाची पार्श्वभूमी तयार करण्याचे काम होमरूल चळवळीने केले.

३. परदेशातील नागरिकांमध्ये भारतीय स्वातंत्रलढ्याविषयी जागृती निर्माण केली.

४. जहाल व गांधीवादी या विचारसरणीतील पोकळी भरून काढण्याचे काम केले.

**होमरूल लीग :** लोकमान्य टिळक यांची १९१४ मध्ये मंडाले च्या तुरुंगातून सुटका झाली तेव्हा कॉंग्रेस वर नेमस्तांचे वर्चस्व होते.फिरोजशाह मेहता याचा जहालवादाला विरोध असल्यामुळे १९१५ पर्यंत लोकमान्य टिळकांचा कॉंग्रेस प्रवेश लांबला.जहालांना डिसेंबर १९१५ च्या राष्ट्रीय कॉंग्रेस अधिवेशनामध्ये प्रवेश मिळाला.या वेळी राष्ट्रीय आंदोलनाची गती मंदावली होती तसेच ब्रिटीश सरकार पहिल्या महायुद्धात गुंतले असल्याने याचा फायदा घेऊन भारतीयांनी सहकार्याच्या मोबदल्यात जास्तीत जास्त राजकीय हक्क मिळवले पाहिजेत असा लोकमान्य टिळकांचा विचार होता म्हणून याच अधिवेशनात डॉ ॲनी बेझंट यांच्या होमरूल चळवळीची कल्पना त्यांनी स्वीकारली. होमरूल मुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळ गतिमान होईल असे त्यांना वाटत होते. २८ एप्रिल १९१६ रोजी लोकमान्य टिळकांनी होमरूल लीग ची स्थापना केली व पुणे येथे कार्यालय ठेवले.जोसेफ बॅपटीस्टा यांना अध्यक्ष तर न.चि.केळकर यांना सचिव केले गेले. डॉ.मुंजे, दादासाहेब खापर्डे, करंदीकर इ. कार्यकर्ते लोकमान्य टिळक यांच्यासोबत काम करत होते. ॲनी बेझंट यांची होमरूल लीग व लोकमान्य टिळकांची होमरूल यांनी संघर्ष टाळण्यासाठी आपापले कार्यक्षेत्र निश्चित केले . लोकमान्यची होमरूल लीग मुंबई वगळता महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रांत व वऱ्हाडमध्ये कार्य करणार होती या दोन्ही लीग एकमेकात विलीन करण्यात आल्या नाहीत. होमरूलचा प्रचार करण्यासाठी टिळकांनी महाराष्ट्राचा दौरा केला. आपल्या भाषणमधून होमरूलची मागणी लोकांपर्यंत पोहचवली. होमरूल संदर्भात लोकमान्य म्हणतात “भारत अशा वयात आलेल्या मुलासारखा आहे वडिलांनी त्याचे योग्य अधिकार त्याला दिले पाहिजेत. भारतीय जनतेने हे घडून आणले पाहिजे तो त्यांचा अधिकारच आहे” स्वराज्याची मागणी त्यांनी भारताच्या भाषावार प्रांतरचनेशी व देशी भाषामधून शिक्षण देणाऱ्या मागणीशी जोडून दिली.टिळकांच्या होमरूलचे अधिष्ठान सर्वस्वी धर्मनिरपेक्ष होते.

**होमरूलचा उददेश :** सर्व सनदशीर मार्गांनी ब्रिटीश साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळवणे आणि ते मिळवण्याच्या दृष्टीने शिक्षण देऊन जनमत संघटीत करणे हा होमरूलचा उददेश होता.होमरूलच्या माध्यमातून गावे व खेड्यामध्ये संघटनात्मक दुवा निर्माण करणे व स्वराज्याची कल्पना लोकप्रिय करून राष्ट्रवादाला पोषक वातावरण निर्माण कारणे हा होमरूल चळवळ सुरु करण्यामागे लोकमान्य टिळकांचा उददेश होता.होमरूलच्या स्थापनेपासून स्वराज्याची भूमिका राष्ट्रद्रोहाची नसल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. मराठातील अग्रलेखामध्ये होमरूल बाबत टिळकांनी पुढील लिखाण केले होते ‘स्वराज्यप्राप्ती साठी संघटना बांधण्याची वेळ आता आली आहे हे कार्य जबाबदारपणे कॉंग्रेसच हाती घेणार आहे पण कॉंग्रेस

अवाढव्य संस्था असल्यामुळे स्वराज्याची योजना आखून ती कार्यरत करण्यासाठी कुणीतरी पूर्वतयारी करायला हवी,तशी केवळ पहिली पायरी म्हणून होमरूलकडे पाहावे.

**होमरूलचा प्रचार व प्रसार :** ३१ मे व १ जून १९१६ मध्ये अहमदनगर येथे टिळकांनी स्वराज्य संघांच्या / होमरूल लीगच्या प्रचारासाठी सभा घेतली. या सभेतील व्याख्यानांमध्ये मध्ये टिळकांनी ब्रिटीश साम्राज्याच्या अस्तित्वाचे समर्थन केले परंतु ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या लोभी व जुलमी वृत्तीवर टीका केली. संरक्षण, परराष्ट्र धोरण अशा मोजक्या बाबी सोडल्या तर बाकीचा सर्व कारभार हिंदुस्थानच्या प्रजेकडे सोपवला जावा अशी मागणी केली.होमरूलची कल्पना सोप्या शब्दात त्यांनी पुढीलप्रमाणे मांडली "होमरूल म्हणजे आपल्या घरातील कारभार आपल्याच हाती राखणे, परोक्ष शासनयंत्रणा आहे तशीच ठेवून दृश्य कारभारात मात्र परिवर्तन घडवून आणण्याचे साधन आहे. थोडक्यात इंग्लंड मध्ये इंग्लिश व्यक्तीला जे स्थान आहे तेच माझ्या देशात मला मिळायला हवे" बेळगांव व अहमदनगर येथील व्याखानांमध्ये त्यांनी सरकारप्रती अप्रीतीची भावना निर्माण केली म्हणून त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला भरण्यात आला.९ नोव्हेंबर १९१७ ला न्या. बॅचलर व न्या शहा यांच्यासमोर खटल्याची सुनावणी होऊन टिळकांना दोषमुक्त करण्यात आले या नंतर होमरूलचे कार्य त्यांनी जोरदारपने सुरु केले.

होमरूलच्या प्रसारासाठी टिळकांनी सहा मराठी व दोन इंग्रजी पुस्तिका प्रकाशित केल्या.त्यांच्या ४७ हजार प्रती संपल्या. तसेच The Case For Indian Home Rule नावाचे पुस्तक न.चि. केळकर यांच्याकडून लिहून घेतले.मराठा व केसरी या वर्तमानपत्रातून होमरूल चळवळीचा प्रसार केला. संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे काढून आपल्या भाषणांमधून जनमत ढवळून काढले.१९१६ मध्ये सदस्य संख्या १४हजार होती ती १९१७ साली ३३ हजार इतकी झाली.होमरूल चळवळ ही निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ होती.सरकारच्या दडपशाही व अन्यायकारक कायद्यांपुढे लोकांनी न नमता आपली चळवळ पुढे चालू ठेवली पाहिजे. हे करीत असताना अन्यायी कायदे आपण पाळलेच पाहिजेत असे आपल्यावर बंधन नाही असे त्यांचे मत होते.

**नेमस्तांचा सहभाग :** राष्ट्रीय कॉंग्रेसच्या निष्क्रियतेवर नाराज असलेल्या अनेक नेमस्तानी होमरूल चळवळीत भाग घेतला. भारत सेवक समाजाच्या सदस्याना लीगचे सदस्य होता येत नसे तरीही या समाजाच्या अनेक सदस्यांनी व्याखानांचे दौरे काढून व पुस्तिका प्रकाशित करून होमरूलच्या मागणीचे आपल्या परीने समर्थन केले.नेमस्त कॉंग्रेसजन ज्या राजकीय प्रचाराचा व शिक्षणाचा आग्रह करत असत त्याचीच अंमलबजावणी होमरूल चळवळ करत असल्याने नेमस्तांचा सहभाग आश्चर्यकारक नव्हता.

Scanned with OKEN Scanner

लखनौ करार: डिसेंबर १९१६ ला लखनौ येथे राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन भरले या अधिवेशनासाठी होमरूलचे कार्यकर्ते खास होमरूल रेल्वेने लखनौला गेले. याच अधिवेशनामध्ये लोकमान्य टिळकांनी "Home Rule Is My Birth Right and I Shall Have It" प्रसिद्ध घोषणा दिली. लोकमान्य टिळक व ॲनी बेझंट यांनी या अधिवेशनात राष्ट्रीय कॉंग्रेस व मुस्लीम लीग मध्ये समेट घडवून आणण्यात महत्वाची भूमिका पार पडली. लखनौ कराराने हिंदू–मुस्लीम ऐक्याचे नवे पर्व सुरु झाले व बॅ.जीना,महमद अली, शौकत अली यासारखे मुसलमान पुढारीही होमरूल चळवळी मध्ये सहभागी झाले. ब्रिटीशांच्या फोडा व राज्य करा या नीतीला या कराराने शह दिला. लखनौ अधिवेशनानंतर लगेच महाराष्ट्रात परत न येता होमरूल चळवळीच्या प्रचारासाठी त्यांनी कानपूर,कलकत्ता या ठिकाणी सभा घेऊन जागृती निर्माण केली.कानपूर व्याखानात होमरूल ची भूमिका त्यांनी पुढीलप्रमाणे मांडली "आम्ही साम्राज्यात राहू ते बरोबरीच्याच नात्याने नुसते भारवाहक वा दास म्हणून साम्राज्यात राहण्याची आमची मुळीच इच्छा नाही. भारतीयांप्रमाणेच आशिया खंडाचे रहिवासी असूनही जपानी लोकांना स्वराज्य,स्वातंत्र्य व दायित्व उपभोगता येते तर ते आम्हाला का लाभू नये" भारतीय लोक ब्रिटीश साम्राज्याच्या रक्षणासाठी सर्व प्रकारची मदत करायला तयार आहेत फक्त आम्हाला स्वराज्य मिळाले पाहिजे असे निर्भीडपणे सांगितले.

**परदेशातील कार्य** : स्वराज्याच्या प्रश्नाची बाजू मांडण्यासाठी जोसेफ बाप्तीस्टा यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ पाठवले गेले. या शिष्टमंडळाने इंग्लंडमध्ये दौरे काढून इंग्लिश नागरिकांना हिंदी स्वराज्याचा प्रश्न समजावून सांगितला.मार्च १९१८ मध्ये टिळकांनी आजून एक शिष्टमंडळ इंग्लंड मध्ये पाठवले परंतु या शिष्टमंडळाला ब्रिटीश सरकारने जिब्राल्टरच्या खाडीतूनच परत भारतात पाठवले. त्यामुळे स्वतः टिळकांनी होमरूलच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करीत इंग्लंडला जाण्याचा निर्णय जाहीर केला. मारवाडी समाजातील छोट्या कापड दुकानदारांनी त्यांना १५ हजार रुपयांचा निधी दिला तर मुंबईच्या गिरणीतील १६ हजार कामगारांनी प्रत्येकी १ आणा याप्रमाणे १ हजार रुपयांचा निधी जमा करून दिला.होमरूल चळवळीने समाजातील खालच्या वर्गाला सुद्धा कसे प्रेरित केले होते याचे हे बोलके उदाहरण होते .मार्च १९१८ मध्ये लोकमान्य टिळक, खापर्डे,केळकर,करंदीकर,बिपिनचंद्र इ. मंडळी इंग्लंडला जाण्यासाठी निघाली परंतु ब्रिटीश सरकारने त्यांचा पासपोर्ट रद्द करून कोलंबो येथूनच त्यांना परत पाठवले.पुढे लोकमान्य टिळकांनी लाला लजपतराय,एस एच हर्डीकर व के डी शास्त्री इ. मंडळीना अमेरिकेत पाठवले त्यांनी सॅनफ्रान्सिस्को येथे होमरूल लीग ची शाखा स्थापन केली.चर्चा, पत्रिका, व्याख्याने याद्वारे भारतीय स्वातंत्र्यासाठी तेथील जनमत अनुकूल करून घेतले. या कार्यामुळेच इंग्लंड मध्ये हिंदुस्थानप्रेमी

पार्लमेंटच्या सभासदांची एक समिती स्थापन करण्यात आली तर १९१८ मध्ये नॉटिंगहॅम येथे मजूर पक्षाची परीषद भरून तिच्यामध्ये हिंदुस्थानला वसाहतीचे स्वराज्य देण्याविषयीचा ठराव एकमताने मान्य झाला.

**होमरूल आंदोलन दडपण्याचा प्रयत्न :** ब्रिटीश सरकारने होमरूल चळवळ दडपून टाकण्यासाठी विविध मार्गांचा वापर केला. लोकमान्य टिळकांच्या भाषणातील आक्षेपाहर्य भागाचे निमित्त करून त्यांच्यावर खटला भरला. टिळक व बिपिनचंद्र पाल यांना पंजाब व दिल्ली येथे प्रवेशबंदी करण्यात आली.

**होमरूल चळवळीचे कार्य :** भारतीय स्वातंत्र्य चळवळीत होमरूलचे योगदान महत्वाचे आहे.या चळवळीने स्वातंत्र्य आंदोलनात आक्रमकता आणली. या चळवळीच्या कार्याचे परीक्षण पुढीलप्रमाणे करता येईल

१. १९१७ ची ऐतिहासिक ऑगस्ट घोषणा ही होमरूलचा रेटा कमी करण्यासाठी करण्यात आली.
२. राष्ट्रीय सभेने ब्रिटीशांकडे स्वराज्याची मागणी करण्यास सुरुवात केली.
३. परदेशातील लोकांना भारताच्या राजकीय परीस्थिती विषयी माहिती मिळाली व
४. भारतीय स्वातंत्र्यासाठी त्यांच्या मनात आस्था निर्माण झाली .
५. हिंदू–मुस्लीम ऐक्याचा नवा अध्याय भारतीय स्वातंत्र्य चळवळी मध्ये सुरु केला.
६. उत्साही राष्ट्रवादी कार्यकर्त्यांची निर्मिती केली .
७. स्वराज्याचे हक्क हे चळवळ उभारून व राज्यकर्त्यांशी संघर्ष करूनच मिळवायचे असतात ही वस्तुस्थिती राष्ट्रसभेच्या नेत्या पुढे मांडली.
८. या चळवळीत प्रथमच हिंदी स्रिया सामील झाल्या.
९. भारतामध्ये राष्ट्रवादाला पोषक वातावरण निर्मिती केली.

होमरूल चळवळ फार काळ चालू राहिली नाही कारण होमरूल लीगने केलेली वसाहतीचे स्वराज्य ही मागणी जहाल तरुणांना मवाळ वाटू लागली व त्यांच्यात निराशा निर्माण झाली.तसेच या चळवळीवर ब्राम्हणांचा प्रभाव आहे असा प्रचार करण्यात आल्यामुळे बहुजन समाज या चळवळी पासून दूर राहिला. राष्ट्रीय सभेचा ही या चळवळीला अंतर्गत विरोध होता. लोकमान्य टिळकांच्या मृत्यू नंतर या चळवळीला प्रभावी नेता मिळाला नाही.परंतु जहालवादी चळवळ व गांधी युग यातील पोकळी भरून काढण्याचे काम या चळवळीने केले.उत्साही राष्ट्रवादी कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली स्वराज्याची कल्पना लोकप्रिय करून देशात सर्वत्र माहित केली.

## संदर्भ

१. बिपन चंद्र. – 'इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स',के सागर,पुणे,२००३
२. बिपन चंद्र. – 'स्वातंत्र्याचा लढा', नॅशनल बुक,मुंबई ,२००४

३. बिपन चंद्र. – 'मॉडर्न इंडिया', के सागर प्रकाशन,पुणे,२००६
४. ग्रोव्हर बी एल. – 'आधुनिक भारताचा इतिहास' के सागर पब्लिकेशन,पुणे,२००३
५. मोरे सदानंद. दृ 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक',गंधर्व वेदप्रकाशन,पुणे, २०१०
६. कुलकर्णी अ.रा.–'भारतीय स्वातंत्र आंदोलन', स्नेहवर्धन पब्लिकेशन हाउस,पुणे,ऑक्टोबर १९९६.
७. वैद्य सुमन – 'आधुनिक भारताचा इतिहास', श्री साईनाथ प्रकाशन,नागपूर,२००१.
८. www dailyhunt news डॉ दीपक टिळक यांचा लेख.
९. तरुण भारत लेख ०२/०६/२०१६.

श्री ढोकेश्वर कॉलेज,
टाकळी ढोकेश्वर
ता. पारनेर जि. अहमदनगर
**E-mail - shantagadge@gmail.com**
फोन.नं. ९७६६११८३८१

Scanned with OKEN Scanner